**Darshanam.org**

**Dr. Pooja Sardeshmukh**

#203 Amruta Apartments

Ashok Path, Off Law college road

Erandavane, Pune, 411004

email: Pooja.chandrakant@gmail.com

vinitahranade@gmail.com

---

दि. २१ सप्टेंबर २०१०

कृपया प्रसिद्धीसाठी :

## ‘दर्शनम्’तर्फे पं. वसंत गाडगीळ यांचा २९ रोजी सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

**‘दर्शनम्’** या ‘भारतीय संस्कृती’चा प्रसार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या संस्थेच्या वतीने, ‘भारत विश्व ज्ञानपीठम्’ (इंडियन इंटरनॅशनल मल्टीवर्सिटी) या विद्यापीठाच्या भारतीय ज्ञान प्रणालीचे **गुरुकुलाचार्य पंडित वसंत अ. गाडगीळ** यांच्या ऐंशी वर्ष पूर्तिनिमित्त, सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी, श्रीरामानुज मिशन ट्रस्ट (चेन्नई)चे प्रमुख **श्री. प्रसन्नवेंकटाचार्य चतुर्वेदी** आणि प्रसिद्ध विचारवंत **डॉ. प्र. ल. गावडे** या मान्यवरांच्या हस्ते पं. गाडगीळ यांचा कृतज्ञतापूर्ण सत्कार करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध सतार-कलावंत आणि पं. रविशंकर व अन्नपूर्णादेवींचे शिष्य **डॉ. चंद्रकांत सरदेशमुख** यांचे वादन, तसेच पंडिता रोहिणी भाटे यांची शिष्या **प्रा. आभा वांबुरकर** व सहकलावंत वरील समारंभात शास्त्रीय नृत्य सादर करणार आहेत. एम.आय.टी आणि विश्व शांती केंद्राचे संस्थापक **डॉ. विश्वनाथ कराड** आणि ‘भारत विश्व ज्ञानपीठम्’चे कुलपती **डॉ. विजय भटकर** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम **बुधवार दि २९ सप्टेंबर ला सायंकाळी ५.३० वाजता, एम.आय.टी.** आवारातील **संत श्री ज्ञानेश्वर हॉल,** पौड रस्ता, कोथरुड, पुणे येथे होणार आहे. ‘दर्शनम्’ संस्थेच्या वतीने पुणेकरांना या समारंभाचे सस्नेह निमंत्रण आहे.

---

आपले विनीत,

डॉ. पूजा सरदेशमुख
अध्यक्ष

(विनीता रानडे)
समन्वयक
संपर्क : ९७६४२७७१४४